# ग्राहकांना गॅस वितरण घरपोच करावे: जिल्हाधिकारी

**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

घरगुती गॅस सिलिंडरचा पुरवठा सुरळीत होऊन स्थिती पुर्वपदावर आणण्यासाठी कठोर उपाययोजना राबवा. कोणत्याही परिस्थितीत ग्राहकाला गॅस सिलींडर हे घरपोच डिलीव्हरीद्वारेच पोहोचवावे,असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज दिले. गॅस पुरवठ्याबाबत येत असलेल्या तक्रारींच्या अनुषंगाने आज जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक बोलावण्यात आली. लोकांना सिलींडर मिळविण्यासाठी हाल सोसावे लागत असल्याने जिल्हाधिकारी स्वामी यांनी गॅस पुरवठादार संस्थांची बैठक बोलावली. जिल्हा पुरवठा अधिकारी प्रवीण फुलारी, गॅस उत्पादक कंपन्यांचे प्रतिनिधी नितीन बजाज, शुभम चौहान तसेच रेखा केदारे, माधुरी कदम, सविता काकडे तसेच जिल्ह्यातील अन्य गॅस वितरक उपस्थित होते. जिल्ह्यात गॅसचे बुकींग वाढले आहे. युद्धाच्या



पार्श्वभुमिवर हे बुकींग वाढले असून दिलेल्या मुदतीत लोकांना सिलेंडर घरपोच दिले जात आहे. मार्च, एप्रिल महिन्यात असणाऱ्या सरासरी पुरवठ्या इतकीच मागणी होत असल्याचे कंपनीचे प्रतिनिधी यांनी निदर्शनास आणले. गॅसचे बुकींग ऑनलाईनच होत आहे. मात्र अनेक लोक सिलींडर संपल्यावर थेट सिलींडर घेऊनच एजन्सीवर गर्दी करत आहेत,असे एजन्सीधारकांतर्फे सांगण्यात आले. जिल्हाधिकारी स्वामी यांनी निर्देश दिले की, कोणताही ग्राहक सिलींडर घेऊन एजन्सीवर येता कामा नये. ग्राहकाने बुकींग केल्यानंतर त्याला घरपोच डीलीव्हरीद्वारेच सिलींडर पोहोचविणे बंधनकारक आहे. सद्यस्थितीत नवीन गॅस जोडणी हे काम बंद आहे. तसेच काही ग्राहकांची ई केवायसी बाकी आहे. ते काम ग्राहक ऑनलाईन करु शकतात. जिल्हाधिकारी पुढे म्हणाले की, सद्यस्थितीत प्रशासनाचा एक कर्मचारी गॅस एजन्सीवर नियंत्रणासाठी नियुक्त करण्यात आला आहे. त्यामुळे येत्या २४ तासात वितरण सुरळीत करावे, अन्यथा कायदेशीर कारवाई करावी लागेल असे जिल्हाधिकारी स्वामी यांनी बजावले. गॅस एजन्सीधारकांनी सांगितले की, काही ठिकाणी डिलीव्हरी वाहनाला पोलीस बंदोबस्त असणे आवश्यक आहे. त्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी पोलिसांना तातडीने निर्देशीत केले. गॅस सिलींडर ग्राहकापर्यंत नेणाऱ्या वाहनांना पोलीस पेट्रोलिंग देणे आवश्यक करावे,असे त्यांनी सांगितले.

## प्राध्यापक सातपुते सर याच्या हस्ते नवनिर्वाचित पोलिसांचा सत्कार संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

श्री जगदंबा पेट्रोलियम, बाभळवाडी येथे मौजे ईट येथील दत्तात्रयजी डोईफोडे यांचे चिरंजीव विकास डोईफोडे व मौजे पिंपळादेवी येथील सखारामजी कानडे यांचे चिरंजीव माऊली कानडे या दोन्ही होतकरू युवा तरुणांची अमरावती पोलिस दलात निवड झाल्याबद्दल शिवसेना माजी जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांनी त्यांना शाबासकीची थाप देत मनःपूर्वक अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. ग्रामीण भागातून अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत मेहनत, जिद्द



आणि चिकाटीच्या जोरावर या दोन्ही तरुणांनी मिळवलेले हे यश खरोखरच अभिमानास्पद आहे. त्यांच्या या यशामागे त्यांच्या कुटुंबियांचे, विशेषतः वडिलांचे मोलाचे मार्गदर्शन, संस्कार आणि पाठबळ आहे. मुलांच्या यशामुळे आज त्यांच्या वडिलांचा उंचावलेला मान हा संपूर्ण गावासाठीच नव्हे तर पिंपळनेर सर्कल साठी अभिमानाची बाब आहे असे मनोगत परमेश्वर सातपुते सर यांनी यावेळी व्यक्त केले. यावेळी सोबत युवानेते शामजी काकडे,युवानेते राजाभाऊ नरवडे, युवानेते भागवतजी कदम, युवानेते सतिष भाऊ इतापे, अंकुश भाऊ सातपुते, सनराईज इंग्लिश स्कूल चे संस्थापक अध्यक्ष रामेश्वर सातपुते सर, हनुमान दाजी निर्धार, नंदकुमार चौरे, ज्ञानेश्वरजी गिरी, पांडुरंगजी घुमरे, सखारामजी जाधव, दत्ता पवार, पप्पू भटे, बाबूराव सातपुते, केशव निर्धार,राकेश ढोले सह सर्व सहकारी व गावकरी उपस्थित होते..!

## मातोश्री बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या अध्यक्षा यांच्याकडून मातोश्री ग्रामीण रुग्णालयाची पाहणी

**बीड । प्रतिनिधी**

मातोश्री बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, बीडच्या अध्यक्षा सौ. छाया दिलीप पवार यांनी नुकतीच जिजाऊ नगर, काठोडा येथील मातोश्री कॅम्पसमधील 'मातोश्री ग्रामीण रुग्णालयाला' सदिच्छा भेट देऊन पाहणी केली. या पाहणी दरम्यान त्यांनी रुग्णालयातील सर्व वैद्यकीय सुविधा आणि कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला.या भेटीत सौ. छाया पवार यांनी रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांची आस्थेवाईकपणे विचारपूस केली. विशेष म्हणजे, या रुग्णालयात रुग्णांची मोफत आरोग्य तपासणी केली जात असून, त्यांना आवश्यक ती सर्व औषधेही मोफत दिली जात आहेत. या मोफत सुविधांचा लाभ घेणाऱ्या रुग्णांना मिळणारे उपचार आणि रुग्णालयातील व्यवस्था सुरळीतपणे सुरू असल्याची खात्री



त्यांनी यावेळी केली. तळागाळातील रुग्णांना दर्जेदार आणि मोफत आरोग्य सेवा मिळावी, या संस्थेच्या उद्देशानुसार कामकाज होत असल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. या पाहणी दरम्यान मातोश्री ग्रामीण रुग्णालयाच्या प्रमुख डॉ. स्नेहल दिलीप पवार उपस्थित होत्या. त्यांच्याकडून सौ. छाया पवार यांनी रुग्णालयाच्या दैनंदिन कामकाजाची, उपलब्ध असलेल्या मोफत वैद्यकीय सुविधांची आणि रुग्णांवर होत असलेल्या उपचारांची सविस्तर माहिती जाणून घेतली. डॉ. स्नेहल पवार यांच्या नेतृत्वाखाली रुग्णालयाचे कामकाज उत्तम प्रकारे सुरू असल्याबद्दल त्यांनी कौतुक केले. या पाहणी दौऱ्यात त्यांनी केवळ सुविधांचाच आढावा घेतला नाही, तर रुग्णालयातील सर्व डॉक्टर, सहकारी कर्मचारी आणि तेथे उपस्थित असलेल्या नागरिकांशी मनमोकळा संवाद साधला. आरोग्य कर्मचाऱ्यांशी चर्चा करून त्यांनी रुग्णांना अधिकाधिक चांगली आणि आपुलकीची सेवा देण्यासाठी सर्वांना प्रोत्साहित केले. अध्यक्षांच्या या भेटीमुळे रुग्णालयातील कर्मचारी आणि रुग्णांमध्ये उत्साहाचे व समाधानाचे वातावरण पाहायला मिळाले.

## मिशन लक्ष्यवेध जिल्हास्तरावर क्रीडा प्रतिभा विकास केंद्रा अंतर्गत खेळाडू निवड चाचणी आयोजित

**नांदेड । प्रतिनिधी**

क्रीडा व युवक सेवा संचालनालयमार्फत राज्यातील विकासाकरीता मिशन लक्ष्यवेध या महत्त्वाकांक्षी उपक्रमांतर्गत खेळाडू निवड चाचणी आयोजित करण्यात येणार आहे. या चाचणीमध्ये विविध क्रीडा प्रकारांतील होतकरू व गुणवान खेळाडूंना प्रोत्साहन व पुरस्कार, खेळांडूना करीअर मार्गदर्शन खेळांडूच्या क्षमता विकासासाठी देशी, विदेशी संस्थाचा सहयोग हे सर्व घटक विकसित करणे अभिप्रेत आहे. उपरोत घटक विकसीत करण्याकरीता आवश्यक प्रयत्न हे फक्त राज्यस्तरावरून नव्हे तर जिल्हास्तरावरून देखील होणे अपेक्षित आहे. त्या करीता नांदेड जिल्हयास मिशन लक्ष्यवेध या योजने अंतर्गत जिल्हास्तरावर प्रतिभा विकास केंद्र नांदेंड करीता टेबल टेनिस, बॅडमिंटन, आर्चरी, हॉकी, थलेटीक्स या पाच क्रीडाप्रकारांचे खेळांची केंद्र सुरू करावयाची आदेश प्राप्त झाले होते. परंतू २९.०३.२०२६ रोजी आयुक्त, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या ऑनलाइन बैठकीतील चर्चा नुसार आर्चरी, हॉकी व थलेटीक्स या खेळांचे जिल्हा क्रीडा संकूल येथे या खेळाचे मैदान उपलब्ध नसल्यामुळे जिल्हा प्रतिभा केंद्र अंतर्गत आर्चरी, हॉकी व थलेटीक्स खेळ रदद करण्यात आलेले आहेत. याची नोंद घ्यावी.

सदर निवड प्रक्रियेदरम्यान खेळाडूंची शारीरिक क्षमता, तांत्रिक कौशल्य, मानसिक तयारी तसेच खेळातील कामगिरी यांचे मूल्यमापन करण्यात येणार आहे. अनुभवी प्रशिक्षक व तज्ज्ञांच्या उपस्थितीत ही निवड चाचणी पार पडणार आहे. या उपक्रमाचा उद्देश गुणवंत खेळाडूंची निवड करून त्यांना उच्चस्तरीय प्रशिक्षण देणे व राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर उत्कृष्ट कामगिरी करण्यासाठी तयार करणे हा आहे.

खालील प्रमाणे निवड चाचणी ठिकाण व खेळप्रकार नमुद करण्यात आलेले आहेत. १) टेबल टेनिस २) बॅडमिंटन या खेळाची निवड चाचणी दि.०२/०४/२०२६ वेळ स.१०.०० वा. जिल्हा क्रीडा संकुल इनडोअर हॉल, नांदेड संपर्क क्रं. चंद्रप्रकाश होनवडजकर (रा.क्री.मा.) मो.७९७२९५३१४१, हानमंत नरवाडे मो.९६०४८६६२५३.

खेळाडू निवड चाचणीचे निकष व पात्रता– (१).वयोमर्यादा २१ वर्षाआतील मुले/मुली त्यावर्षाच्या ३१ डिसेंबर रोजी) (२) जन्म दाखला,शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र,अधिवास प्रमाणपत्र, आधारकार्डे,गत ०२ वर्षातील क्रीडा विषयक कामगिरीचे प्रमाणपत्र, पासपोर्ट साईज ०३ फोटोग्राफ, शाळा महाविद्यालयीन बोनाफाईड प्रमाणपत्र, पालंकाचे संमतीपत्र इ. (३.) महाराष्ट्र राज्यातील खेळाडू असला पाहिजे. (४) क्रीडा कामगिरी– किमान राज्यस्तरावरील सहभाग किंवा पदक प्राप्त खेळाडू) (शालेय/संघटना अधिकृत स्पर्धा) गत २ वर्षाच्या क्रीडा कामगिरीचे मुल्यमापन करण्यात येऊन क्रीडा कौशल्य व तंदुस्ती फिटनेस चाचण्यामध्ये पात्र होणे आवश्यक आहे. (५) शासन मान्यताप्राप्त डॉक्टरांकडून दिलेले वैध वैद्यकिय फिटनेस प्रमाणपत्र अनिवार्य आहे. वरील सर्व कागदपत्रे आवश्यक आहेत. सदर निवड चाचणीत सहभागी होण्यासाठी इच्छुक खेळाडूंनी संबंधित आयोजकांशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी जयकुमार टेंभरे यांनी सुचविले आहे अधिक माहितीसाठी चंद्रप्रकाश होनवडजकर राज्य क्रीडा मार्गदर्शक– मो.७९७२९५३१४१ यांचेशी संपर्क साधावा.

## 8.29 लाखांच्या विक्रीसह नवतेजस्विनी महोत्सव 2026 ची यशस्वी सांगता



**धाराशिव । प्रतिनिधी**

महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम) च्या ५१ व्या वर्धापन दिनानिमित्त नवतेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण महिला उद्यम विकास प्रकल्पांतर्गत २७ ते २९ मार्च २०२६ दरम्यान धाराशिव क्लब मैदान,शहर पोलीस स्टेशनजवळ, धाराशिव येथे आयोजित नवतेजस्विनी महोत्सव २०२६ चा उत्साहात समारोप आज झाला.या महोत्सवाचे उद्घाटन २७ मार्च २०२६ रोजी जिल्हाधिकारी श्री.कीर्ती किरण पुजार यांच्या हस्ते करण्यात आले. या जिल्हास्तरीय प्रदर्शनात धाराशिव जिल्ह्यातील स्वयंसहाय्य महिला बचत गटांनी उत्पादित केलेल्या विविध वस्तूंचे एकूण ४२ स्टॉल्स उभारण्यात आले होते.यामध्ये ज्यूस,उसाचा रस,लिंबू सरबत, गावरान तूप, अंडी,वर्मी कंपोस्ट खत, धान्य,कडधान्य, राजमा, कडक भाकरी ,शेंगांची चटणी, दुग्धजन्य पदार्थ, मसाले, पापड, कुरडई, शेवया, मनुके, हस्तकला व शोभेच्या वस्तू, मूर्ती, फ्लॉवर पॉट,रेडीमेड कपडे तसेच विविध खाद्यपदार्थांचा समावेश होता.या तिन्ही दिवसांत स्टॉलधारकांची एकूण सुमारे ८ लाख २९ हजार रुपयांची विक्री झाली असून महोत्सवाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. महोत्सवाच्या समारोप प्रसंगी निवासी उपजिल्हाधिकारी श्री. विद्याचरण कडवकर, सहायक पोलीस निरीक्षक श्री.दिनेश जाधव, संरक्षण अधिकारी श्री.भुजंग भोसले, माविमचे जिल्हा समन्वय अधिकारी श्री.सुखदेव चिंचोलीकर,तालुका स्तरीय सी.एम.आर.सी.अध्यक्षा श्रीमती. निर्मला उबाळे,श्रीमती.स्मिता पाटील,श्रीमती.सुरेखा पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.या प्रदर्शनात सहभागी सर्व स्टॉलधारकांचा मान्यवरांच्या हस्ते नवतेजस्विनी महोत्सव २०२६ सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. हा महोत्सव यशस्वी पार पाडण्यासाठी माविम जिल्हा कार्यालय तसेच तालुका स्तरीय सी.एम.आर.सी.यांनी विशेष प्रयत्न केले.धाराशिवकरांनी दिलेल्या उत्स्फूर्त प्रतिसादाबद्दल माविमचे जिल्हा समन्वय अधिकारी श्री. सुखदेव चिंचोलीकर यांनी सर्वांचे मनःपूर्वक आभार मानले.

## जिल्हा परिषद विषय समिती सभापती निवड; गुरुवारी (दि.२ एप्रिल) विशेष सभा

**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

जिल्हा परिषद विषय समिती सभापती निवड करण्यासाठी गुरुवार दि.२ एप्रिल रोजी विशेष सभेचे आयोजन करण्यात आले आहे. ही सभा जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन सभागृहात दुपारी २ वा. होणार आहे. निवड प्रक्रिया सकाळि १० वा. पासून सुरु होणार आहे,असे या सभेचे पिठासीन अधिकारी संतोष गोरड यांनी कळविले आहे.

पिठासीन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी कन्नड संतोष गोरड यांनी दिलेल्या माहितीनुसार, गुरुवार दि.२ एप्रिल रोज ही विशेष सभा जिल्हाधिकारी कार्यलयातील नियोजन सभागृहात होणार आहे. या विशेष सभेचा कार्यक्रम याप्रमाणे– गुरुवार दि.२ एप्रिल रोजी सकाळी १० ते १२ या वेळात नामनिर्देशन स्विकारणे, दुपारी २ वा. विशेष सभेस सुरुवात. प्रथम प्राप्त नामनिर्देशन पत्रांची छाननी, त्यानंतर नामनिर्देशन माघारीसाठी वेळ दिला जाईल. त्यानंतर निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी मराठी वर्णक्रमानुसार करण्यात येईल. त्यानंतर समिती सभापती निवडणूकीसाठी एकापेक्षा जास्त उमेदवार असल्यास हात वर करुन मतदान घेण्यात येईल. या विशेष सभेसाठी उपस्थित राहण्यासाठी जिल्ह्यातील सर्व पंचायत समिती सभापती यांना कळविण्यात आले आहे. तथापि, सभापतींना अध्यक्ष/ उपाध्यक्ष निवडीसाठी मतदान करता येणार नाही. हात वर करुन मतदान करणाऱ्या सदस्याची स्वाक्षरी घेऊन नोंद घेण्यात येईल. या संपूर्ण प्रक्रियेचे व्हिडीओ चित्रीकरण करण्यात येईल. या सभेसाठी नवनिर्वाचित एकूण ६३ जिल्हा परिषद सदस्य व ९ पंचायत समिती सभापती यांना बैठकीसाठी बोलावण्यात आले आहे,असेही पिठासीन अधिकारी संतोष गोरड यांनी कळविले आहे.

# बालाघाटावर दत्त मूर्ती प्राणप्रतिष्ठा व कलशारोहण सोहळा; त्रिदिनी कीर्तन महोत्सवाचे आयोजन

**● सर्व पंचक्रोशीतील भावीक भक्तांनी लाभ घ्यावा–दत्त उपासक वैजिनाथ महाराज शिंदे**

**बीड । प्रतिनिधी**

संत परंपरेचा गौरव वाढविणारा आणि भक्तिमय वातावरण निर्माण करणारा दत्त मूर्ती प्राणप्रतिष्ठा व भव्य कलशारोहण सोहळा तसेच त्रिदिनी कीर्तन महोत्सव बालाघाट येथील दत्त संस्थानमध्ये मोठ्या



उत्साहात आयोजित करण्यात आला आहे. हा सोहळा गुरुवार दि. २ एप्रिल २०२६ ते



शनिवार दि. ४ एप्रिल २०२६ या कालावधीत संपन्न होणार आहे.

ह.भ.प. वै. गुरु बंकट स्वामी महाराज (नेकनूर) यांच्या कृपेने तसेच श्री मन्मथ स्वामी, श्रीक्षेत्र कपिलधार व वाघेश्वरी माता यांच्या आशीर्वादाने या धार्मिक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे मार्गदर्शन प.पू. तपोरत्न श्री. ष. ब्र. १०८ शिवानंद शिवाचार्य महाराज (तमलुरकर) हे असून, ह.भ.प. लक्ष्मण महाराज मेंगडे (मठाधिपती, बंकट स्वामी संस्थान – निनगुर, पंढरपूर, आळंदी) यांचे विशेष मार्गदर्शन लाभणार आहे.

या त्रिदिनी महोत्सवात दररोज पहाटे काकडा भजन, सकाळी महायज्ञ, दुपारी महाप्रसाद, सायंकाळी हरिपाठ तसेच रात्री हरीकीर्तन व भजन–जागर अशा विविध धार्मिक कार्यक्रमांची रूपरेषा आखण्यात आली आहे. त्यामुळे परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण होणार असून पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे व श्रवण भक्तीचा लाभ घ्यावा.

या सोहळ्यास ह.भ.प. महादेव महाराज (श्रीक्षेत्र चाकरवाडी), विश्वनाथ अप्पा सलगर (श्रीक्षेत्र कपिलधार), ह.भ.प. हरिहारनंद भारती महाराज (मोरेश्वर संस्थान, कोळवाडी), ह.भ.प. श्रीहरी पवार महाराज (कोल्हारवाडी), माऊली महाराज काकडे (जरूड), अंगद महाराज सातपुते (बीड) यांच्यासह विविध भागातील कीर्तनकार, प्रवचनकार व संत–महंत उपस्थित राहणार आहेत.

महोत्सवातील विशेष आकर्षण म्हणजे विविध गावांतील हरिजागर व कीर्तन सेवा होय.

गुरुवार दि. २ एप्रिल २०२६ रोजी शि. भ. प. विश्वनाथ महाराज स्वामी (श्रीक्षेत्र कपिलधार) यांचे कीर्तन होणार आहे.

शुक्रवार दि. ३ एप्रिल २०२६ रोजी बालकीर्तनकार सोहम महाराज सातपुते यांचे कीर्तन होणार आहे.

शनिवार दि. ४ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११ ते १ या वेळेत ह.भ.प. लक्ष्मण महाराज मेंगडे यांचे काल्याचे कीर्तन होणार असून, त्यानंतर गोरक्ष (दादा) अश्रुबा रसाळ पाटील (मांजरसुंबा, कन्हैया हॉटेल) यांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमासाठी मृदंगाचार्य, गायनाचार्य, काकडा व हरिपाठाचे नेतृत्व करणारे अनेक मान्यवर कलाकार सहभागी होणार असून मंडप, पाणी व इतर सेवा विविध सेवाभावी व्यक्तींमार्फत पार पाडल्या जाणार आहेत.

बालाघाट येथील सोलापूर हायवे लगत बीड–मांजरसुंबा रोड परिसरात होणाऱ्या या धार्मिक सोहळ्यास सर्व भाविकांनी सहकुटुंब उपस्थित राहून दर्शनाचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजक व दत्त उपासक श्री. वैजिनाथ महाराज शिंदे यांनी केले आहे.

दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● मंगळवार दि. ३१ मार्च २०२६ ●



*परळी येथे राज्याच्या पर्यावरण मंत्री मा.ना. पंकजाताई मुंडे साहेब यांच्या निवासस्थानी असलेल्या जनसंपर्क कार्यालयात जाऊन आदरणीय लोकनेते बाळराजे दादा पवार साहेब यांनी त्यांची सदिच्छा भेट घेतली.या भेटीदरम्यान लोकनेते आदरणीय बाळराजे दादा पवार साहेब यांनी गेवराई मतदारसंघातील विविध प्रलंबित विकासकामांच्या संदर्भात ताईंशी सविस्तर चर्चा केली.मतदारसंघातील रस्ते,पाणी आणि इतर मूलभूत सोयीसुविधांबाबतचे निवेदन यावेळी सादर करण्यात आले.गेवराई मतदारसंघाचा सर्वांगीण विकास व्हावा आणि जनसामान्यांचे प्रश्न मार्गी लागावेत,हाच या भेटीमागचा मुख्य उद्देश होता.*

## थोडक्यात...

### शेतकऱ्यांच्या आशेचा किरण ठरल्या शीतल माने मॅडम



**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव तालुक्यात पाटबंधारे विभागाच्या डीपीटी अधिकारी शीतल माने (घायतिडक) मॅडम यांनी शेतकऱ्यांसाठी अतिशय उल्लेखनीय कार्य करत त्यांच्यात नवचैतन्य निर्माण केले आहे. ज्या शेतकऱ्यांना आजवर कधीच पाणी मिळाले नव्हते, अशा शेतकऱ्यांच्या बांधावर स्वतः जाऊन त्यांनी परिस्थितीची पाहणी केली आणि त्यांच्या पिकांसाठी पाण्याची प्रभावी व्यवस्था करून दिली. शेतकऱ्यांच्या अडचणी केवळ कागदोपत्री न पाहता प्रत्यक्ष शेतात जाऊन समजून घेणारे अधिकारी क्वचितच पाहायला मिळतात. मात्र माने मॅडम यांनी ही परंपरा मोडीत काढत शेतकरीहितासाठी काम करण्याची खरी बांधिलकी दाखवून दिली आहे. त्यांच्या या प्रयत्नांमुळे अनेक शेतकऱ्यांच्या पिकांना नवजीवन मिळाले असून, कोरडवाहू परिस्थितीतही आशेचा नवा किरण निर्माण झाला आहे. ज्या शेतकऱ्यांना वर्षानुवर्षे पाण्याअभावी नुकसान सहन करावे लागत होते, त्यांच्यासाठी माने मॅडम म्हणजे खऱ्या अर्थाने आधारवड ठरल्या आहेत. असे अधिकारी मिळणे म्हणजे शेतकऱ्याचे भाग्य, अशा भावना शेतकऱ्यांकडून व्यक्त होत आहेत. त्यांच्या कार्यामुळे प्रशासनाबद्दलचा विश्वास अधिक दृढ झाला आहे. शेतकऱ्यांच्या विकासासाठी आणि त्यांच्या समस्या सोडवण्यासाठी प्रशासनाने अशाच प्रकारे संवेदनशीलतेने काम केल्यास ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास अधिक वेगाने होऊ शकतो. माने मॅडम यांच्या या कार्याचे सर्व स्तरातून कौतुक होत असून, त्या इतर अधिकाऱ्यांसाठी प्रेरणादायी ठरत आहेत.

### सौ.के.एस.के महाविद्यालयात मा. खा. स्व. केशरबाई क्षीरसागर यांची जयंती साजरी



**बीड । प्रतिनिधी**

लोकनेत्या मा.खासदार स्व. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर ऊर्फ काकू यांची जयंती दिनांक ३० मार्च २०२६ रोजी सौ. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर ऊर्फ काकू कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात नवगण शिक्षण संस्थेच्या सहसचिव डॉ. दीपाताई क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली स्व.काकूंच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. प्रा. जयंत साठे यांनी लोकनेत्या माजी खासदार स्व. केशरबाई क्षीरसागर यांनी आशिया खंडातील पहिल्या महिला सहकारी साखर कारखान्याच्या संस्थापक ते बीड जिल्हयात नवगण शिक्षण संस्था, आदर्श शिक्षण संस्था या संस्थाच्या माध्यमातून बीड जिल्हयातील ग्रामिण भागात शिक्षणाची सोय करुन सर्व सामान्य लोकांना उच्च शिक्षणाच्या संधी उपलब्ध करुन दिल्या. त्यामुळेच तमाम गोर गरीब मुलामुलींना नौकरी, व्यवसायत संधी प्राप्त झाली. स्व. काकूंच्या एकूण जीवन कार्याचा परीचय त्यांनी यावेळी करुन दिला. यावेळी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. संजय पाटील देवळाणकर, उपप्राचार्य डॉ. अनिता शिंदे, कमवि उपप्राचार्य डॉ. नारायण काकडे, पदव्युत्तर विभाग प्रमुख डॉ. खान ए.एस. , पर्यवेक्षक प्रा. जालिंदर कोळेकर आदींसह शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. यादव घोडके यांनी केले तर सुत्रसंचालन डॉ. पल्लवी इरलापल्ले यांनी तर आभार डॉ. सय्यद इमामौद्दिन यांनी मानले.

# आदित्य शिक्षण संस्थेतर्फे भव्य रक्तदान शिबिर; 198 रक्तदात्यांचा उत्स्फूर्त सहभाग

**बीड । प्रतिनिधी**

आदित्य शिक्षण संस्थेअंतर्गत आदित्य डेंटल शाखेच्या वतीने समाजातील गरजू रुग्णांना वेळेवर रक्त उपलब्ध व्हावे या उदात्त हेतूने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. सामाजिक बांधिलकी जपत राबविण्यात आलेल्या या उपक्रमाला विद्यार्थी, शिक्षक व नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.





कार्यक्रमाचे उद्घाटन सी.ए. गिरीश गिल्डा यांच्या हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आले. सी.ए. गिरीश यांनी आपल्या मनोगतात रक्तदानाचे महत्त्व अधोरेखित करत, रक्तदान हे जीवनदान असून प्रत्येकाने या कार्यात पुढाकार घ्यावा, असे आवाहन केले. त्यांच्या प्रेरणादायी उपस्थितीमुळे कार्यक्रमाला विशेष उर्जा आणि दिशा मिळाली. या शिबिरात आदित्य शिक्षण संस्थेमधील विविध शाखांचे प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षकवृंद तसेच विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून सक्रिय सहभाग नोंदवला. शिबिरात एकूण १९८ रक्तदात्यांनी स्वेच्छेने रक्तदान करून समाजसेवेचा आदर्श घालून दिला. शिस्तबद्ध नियोजन, उत्तम व्यवस्थापन आणि स्वयंसेवकांच्या कार्यतत्परतेमुळे संपूर्ण शिबिर यशस्वीरीत्या पार पडले. संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा, संचालिका डॉ. आदिती सारडा यांनी या उपक्रमाचे विशेष कौतुक करत सर्व रक्तदाते, आयोजक आणि सहभागी यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले. संचालिका डॉ. आदिती सारडा यांनी आपल्या संदेशात सांगितले की, अशा प्रकारचे सामाजिक आणि मानवतावादी उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव निर्माण करतात. भविष्यातही अशा उपक्रमात अधिकाधिक सहभाग घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

या यशस्वी कार्यक्रमाचे नियोजन व आयोजन डॉ. हिमांशू श्रीवास्तव यांनी अत्यंत उत्कृष्टरीत्या केले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण टीमने समन्वय साधत हा उपक्रम सुरळीतपणे पार पाडला. रक्तदात्यांच्या नोंदणीपासून ते वैद्यकीय तपासणी आणि रक्तसंकलनापर्यंत सर्व प्रक्रिया काटेकोरपणे पार पडली. या रक्तदान शिबिराच्या माध्यमातून समाजात रक्तदानाबाबत जनजागृती होण्यास मोठी मदत झाली असून, गरजू रुग्णांना वेळेवर रक्त उपलब्ध करून देण्याच्या दिशेने हा उपक्रम एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरला आहे.

**रक्तदान हे सर्वात मोठे दान असून यामुळे अनेक गरजू रुग्णांचे प्राण वाचू शकतात. अशा उपक्रमाचा भाग होता आले, याचा मला सार्थ अभिमान वाटतो –प्रेम रवी पोगे (विद्यार्थी)**

**समाजासाठी काहीतरी करण्याची ही एक उत्तम संधी आहे. पुढील काळातही अशा सामाजिक उपक्रमात नक्की सहभागी होण्याचा माझा मानस आहे. –प्रीती सत्यम बोडके (विद्यार्थिनी)**

# वडवणीत गुरुवारी हनुमान जन्मोत्सवाची जय्यत तयारी



## हजारो भाविकांसाठी महाप्रसादाचेही प्रथमच आयोजन

**वडवणी । प्रतिनिधी**

संपूर्ण वडवणीकरांचे आराध्य दैवत असलेल्या श्री.हनुमान जन्मोत्सवानिमित्त मोठा मारुती मंदिर,गावठाण या ठिकाणी दिनांक २ एप्रिल २०२६ गुरुवार रोजी आयोजित करण्यात आलेल्या श्री.हनुमान जन्मोत्सवाची जय्यत तयारी सध्या सुरु असून इतिहासात प्रथमच याठिकाणी या जन्मोत्सवानिमित्त हजारो भाविकांसाठी महाप्रसादाचेही आयोजन करण्यात आले आहे. तरी पंचक्रोशीतील सर्व हनुमान भक्त, भाविक भक्तांनी याप्रसंगी उपस्थित राहून याचा अवश्य लाभ घ्यावा असे आवाहन संयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे. संपूर्ण वडवणीकरांचे आराध्य दैवत असलेल्या मोठा मारुती मंदिर येथील श्री.हनुमान मंदिराचे सजावटीचे काम जवळपास पूर्णत्वास जात असून या मंदिरातील संपूर्ण भागावरील व मंदिर गाभाऱ्यातील ग्रेनाईट तसेच स्टाईल फरशीचे काम, मंदिराच्या आतून व बाहेरच्या बाजूचे आकर्षक असे रंगरंगोटी काम, संपूर्ण शिखराची रंगरंगोटी व सुशोभीकरण, कळसासह संपूर्ण मंदिरावरील अतिशय आकर्षक असे विद्युत रोषणाई, याचबरोबर दुरुनच लक्ष वेधून घेणारा जय हनुमान नावाचा एलईडी लाइटिंग बोर्ड असे एक ना अनेक कामे पूर्ण झालेले असून नव्याने अतिशय मनमोहक व आकर्षक अशी मंदिराची रचना सर्वांना अनूभवता येत आहे. येथील काही युवक भाविकांनी या मंदिराच्या सुशोभीकरणाचा संकल्प मनी करुन हे पुण्य कार्य तडीस लावले आहे. याला हनुमान मंदिर समिती, पंच कमिटी, तसेच समस्त वडवणीकरांचीही सर्वार्थभावाने साथ व सहकार्य मिळाले आहे. व यापुढेही ते मिळतच आहे. विशेष म्हणजे मागील अनेक वर्षांपासून येथील बंद पडलेली साप्ताहिक शनिवारची महाआरती व त्यानंतर महाप्रसाद हा उपक्रम देखील मागील दोन महिन्यांपासून अविरतपणे सुरु असून याला देखील हनुमान भक्त भाविकांनी उदंड प्रतिसाद दिला आहे. या शनिवारच्या महाआरतीचे यजमानपद घेण्यासाठी भाविकांची अक्षरशः गर्दी होतांना दिसून येत आहे. या सर्व सुशोभीकरणानंतर प्रभू हनुमानांच्या मूर्तीवर देखील वेगळेच तेज दिसून येत असल्याची भावना अनेक भाविकांनी याप्रसंगी बोलून दाखवली आहे. यावर्षी दिनांक २ एप्रिल २०२६ गुरुवार रोजी सकाळी ठीक ६ वाजता मोठा मारुती मंदिर वडवणी याठिकाणी प्रभू श्री.हनुमान जन्मोत्सव सोहळा आगळ्यावेगळ्या व ऐतिहासिक अशा स्वरुपात यंदा साजरा होणार असून यानिमित्त इतिहासात प्रथमच याठिकाणी हजारो भाविकांसाठी भव्य अशा महाप्रसादाचेही आयोजन करण्यात आलेले आहे. सकाळी ८ ते १० या वेळेत सर्वांसाठी या महाप्रसादाचे आयोजन करण्यात आलेले असून या महाप्रसादासाठी ज्या कोणी भाविकांना स्वईच्छेने देणगी द्यावयाची असेल अशांनी फुल ना फुलाची पाकळी देणगी देवून या पुण्य कार्यामध्ये आपलाही हातभार लावून या भक्तीमय सोहळ्यात व पुण्यकार्यात आपला सक्रिय सहभाग व सहकार्य आवर्जून द्यावे. यासाठी माऊली उद्योग समूहाचे सर्वेसर्वा विनोद आसलकर यांच्या ९७६७३५१९१९ या क्रमांकावर संपर्क साधावा. तसेच सर्वांनी श्री.हनुमान जन्मोत्सव सोहळा व महाप्रसादाचा अवश्य लाभ घ्यावा असेआवाहनसंयोजनसमितीच्यावतीनेकरण्यातआलेआहे.

# तिरुपती स्कुल येथे वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न

## पत्रकार गीतांजली लव्हाळे यांना महिला पत्रकार पुरस्कार प्रधान



**वडवणी । प्रतिनिधी**

वडवणी मधील तिरुपती प्रायमरी स्कूल या इंग्रजी माध्यमाच्या शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात पार पडले. स्नेहसंमेलनाच्या अध्यक्ष स्थानी वडवणी नगराध्यक्ष शेषेराव जगताप तर उद्घाटन स्थानी मा. बन्सीधर भाऊ मुंडे उपनगरअध्यक्ष प्रमुख पाहुणे श्री बंडूजी खांडेकर, अंगद नरवडे, नगरसेवक नागेशजी डिगे, महारुद्र चोरमले, सचिन आंधळे, पप्पू दादा शिंदे, शाळेचे संचालक लक्ष्मीकांत सोळंके, मुख्याध्यापक प्रा. गणेश सोळंके यांची उपस्थिती होती. प्रा. गणेश सोळंके यांनी प्रस्ताविक केले .तर सुत्रसंचलन पुजा बागडे यांनी केले या स्नेहसंमेलना निमित शाळेच्या वतिने तिरुपती रत्न पुरस्कारः- वेदिका कवचट या विद्यार्थ्याला देण्यात आला तर इर्शी डींविशपीं `ष ींहश ूशरी पुरस्कारः- कुणाल वरकड, महेश नरवडे, सिध्दी गोरे, ईश्वरी बादाडे, राधिका राठोड, अंतरा कोकणे, जान्हवी पंधारे, सुशिल राठोड यांना देण्यात आले तर शाळेचा या वर्षीचा उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार, सौ. पुजा बागडे, ज्ञानेश्वर फपाळ, प्रविण घुमरे यांना देण्यात आला. या कार्यक्रमात वडवणी तालुक्यातील प्रथम महिला पत्रकार यांना आदर्श महिला पत्रकार पुरस्कार श्रीमती. गितांजली लव्हाळे वानखडे .यांना प्रदान करण्यात आला. स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांनी मराठी, हिंदी, कॉमेडी साँग, महाभारत, भारूड या गाण्यावर सदाबहार नृत्यसादर केले या कार्यक्रमात शाळेच्या वतीने सर्व शिक्षकाचा यथोचित सत्कार याठिकाणी करणात आला हा स्नेहसंमेलनाची यशस्वी परंपरा कायम ठेवण्यामध्ये शाळेचे मुख्याध्यापक प्रा. गणेश सोळंके, पूजा बागडे, ज्ञानेश्वर फपाळ, प्रवीण घुमरे, अंजनी कुमार औटी, अमोल पतंगे, अश्विनी क्षीरसागर, श्रध्दा क्षीरसागर, सिंग सर, अश्विनी मावशी, ड्रायव्हर माऊली सुरनार. साई स्कूलच्या प्राचार्य. वर्षा सोळंके, प्रियंका रोटे, अमोल राठोड, अण्णासाहेब खोचरे राजाभाऊ भारती, अजित गायके, विक्रम गार्डी, वरद सोळंके यांनी परिश्रम घेतले तर आभार प्रदर्शन औटी अंजनीकुमार यांनी मानले.

# पिंपळनेर सर्कल मधील युवा तरुणांची पोलीस दलात भरारी; शिवसेना माजी जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुतेंकडून सत्कार व गौरव

**बीड । प्रतिनिधी**

पिंपळनेर सर्कल मधील होतकरू तरुणांनी पोलीस दलात उल्लेखनीय यश संपादन करत परिसराचे नाव उज्ज्वल केले आहे. यानिमित्ताने शिवसेना माजी जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांनी श्री जगदंबा पेट्रोलियम, बाभळवाडी येथे या यशस्वी तरुणांचा सत्कार करून त्यांना शुभेच्छा दिल्या.मौजे ईट येथील दत्तात्रयजी डोईफोडे यांचे चिरंजीव विकास डोईफोडे तसेच मौजे पिंपळादेवी येथील सखारामजी कानडे यांचे चिरंजीव माऊली कानडे यांची अमरावती पोलीस दलात निवड झाली. तसेच मौजे केसापुरी (परभणी) येथील विठ्ठल अवधूत कवचट यांची बीड पोलीस दलात तर मौजे पिंपळनेर येथील पांडुरंग रामप्रसाद नरवडे यांची लातूर पोलीस दलात निवड झाल्याबद्दल त्यांचेही अभिनंदन करण्यात आले.मौजे पिंपळनेर येथील कु.शितल अवधूत गवळी या तरुणीची सुद्धा बीड पोलीस



दलात निवड झाली आहे. या पाचही तरुण/तरुणींनी ग्रामीण भागातील प्रतिकूल परिस्थितीवर मात करत जिद्द, मेहनत आणि



चिकाटीच्या बळावर हे यश संपादन केले आहे. त्यांच्या या यशामागे कुटुंबियांचे, विशेषतः वडिलांचे मार्गदर्शन व पाठबळ महत्त्वाचे ठरले असल्याचे परमेश्वर सातपुते सर यांनी यावेळी सांगितले. मुलांच्या यशामुळे त्यांच्या कुटुंबियांची मान उंचावली असून हा संपूर्ण पिंपळनेर सर्कलसाठी अभिमानाचा क्षण असल्याचे त्यांनी नमूद केले.

यावेळी सोबत केसापुरी (परभणी) येथील सरपंच महेशजी शिंदे, माजी सरपंच बाबासाहेब भाऊ कवचट, लक्ष्मण दादा कवचट, युवानेते अजय भैय्या शिंदे, शामजी काकडे, राजाभाऊ नरवडे, भागवतजी कदम, सतीश भाऊ इतापे, अंकुश भाऊ सातपुते, सनराईज इंग्लिश स्कूलचे संस्थापक अध्यक्ष रामेश्वर सातपुते सर, तसेच जालिंदर बप्पा कवचट, मुकुंदजी कवचट, बाळासाहेब कवचट, पप्पू कवचट, हनुमान दाजी निर्धार, नंदकुमार चौरे, ज्ञानेश्वरजी गिरी, पांडुरंगजी घुमरे, सखारामजी जाधव, दत्ता पवार, पप्पू भटे, बाबूराव सातपुते, केशव निर्धार, गणेश सातपुते, राकेश ढोले यांच्यासह अनेक गावकरी व सहकारी उपस्थित होते.